वाचले : १. इकडील दिनांक ३/११/२०२०,दि.२३/१२/२०२०च्या नोटीस व दि.०७/०४/२०२१रोजीची अंतीम नोटीस.
२. ज्ञापन जा.क्र.मनपा/आस्थावि/१०१५/२०२१-२२ दि. ६/९/२०२१.
३. चौकशी अधिकारी, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचा दिनांक २४/११/२०२१ रोजीचा चौकशी अहवाल.
४. निलंबन व विभागीय चौकशी समितीची दिनांक ०६/०६/२०२२ रोजीची बैठक.

---

क्र.मनपा/आस्थावि/ ९६३ /२०२२-२०२३
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ०८/०६/२०२२

## आदेश

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेकडील कर्मचारी श्री. पॉल राजरत्नम करा, स्टाफ नर्स, नागरी आरोग्य सेवा सांगलीकडील हे दि.१/०१/२००६ पासून विनापरवाना कामावर अनुपस्थित आहेत.

ज्या अर्थी विभागीय चौकशीकामी श्री. पॉल राजरत्नम करा यांना नोटीस काढण्यात आल्या होत्या व सदर नोटीसीचा त्यांनी कोणताही खुलासा सादर केला नाही, त्यामुळे त्यांचे विरुध्द ज्ञापन जा.क्र. मनपा/आस्थावि/१०१५/२०२१-२२ दिनांक ६/९/२०२१ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियम १९७९ मधील नियम ८ अन्वये खालील दोषारोपाबाबत विभागीय चौकशी सुरु करण्यात आली होती.

**आरोप क्र.१.** श्री. पॉल राजरत्नम करा, स्टाफ नर्स, हे दि. १/१/२००६ पासून विनापरवाना कामावर अनुपस्थित आहेत.
**आरोप क्र.२.** श्री.पॉल राजरत्नम करा, स्टाफ नर्स, हे बुध्दीपुरस्सर कामावर अनुपस्थित राहिले असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ४८(२) नुसार शिस्तभंगाचे कारवाईस पात्र होत आहेत.

ज्या अर्थी सदर विभागीय चौकशी प्रकरणी विभागीय चौकशी करण्याकामी उपरोक्त नमूद क्र. २ ज्ञापन नुसार विभागीय चौकशी करण्यात आली असून , चौकशी अधिकारी यांनी चौकशी पुर्ण करुन क्र.३ अन्वये अहवाल सादर केला आहे. त्यानुसार अपचारी कर्मचारी यांनी दोषारोप मान्य केले असलेने ते विभागीय चौकशी प्रकरणात दोषी असलेचे सिध्द झाले आहे. त्यामुळे ते शिक्षेस पात्र आहेत. चौकशी अंती असा निष्कर्ष निघतो की, अपचारी कर्मचारी यांना दोषारोप मान्य असलेने ते या विभागीय चौकशी प्रकरणी दोषी असलेचे सिध्द झाले आहे. त्यामुळे त्यांचेवर शिक्षेचे आदेश पारित करणे आवश्यक असून ते त्यास पात्र आहेत.

आणि ज्या अर्थी चौकशी अधिकारी यांचा अहवाल चौकशी समिती समोर सादर केला असता चौकशी समितीमधील अध्यक्ष व अधिकारी यांनी चौकशी अधिकारी यांचे अहवालाशी सहमत होऊन श्री.पॉल राजरत्नम करा , स्टाफ नर्स, यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियम १९७९ मधील शिक्षा पाहता बडतर्फ करणेकामी कारवाईचा प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुसार श्री. पॉल राजरत्नम करा, स्टाफ नर्स, नागरी आरोग्य सेवा सांगली यांना महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियम १९७९ मधील गंभीर स्वरुपाची शास्ती (नऊ) सेवेतुन बडतर्फ करणे, मात्र भावी काळात शासकीय नोकरी मिळणेचे दृष्टीने सर्वसाधारणपणे ही अनहर्ता ठरेल ही शास्ती देणेत येत आहे.

त्या अर्थी विभागीय चौकशी अहवालाचे निष्कर्ष , प्रकरणातील कागदपत्रे, वस्तुस्थिती व परिस्थिती विचारात घेवून, मी, नितीन कापडणीस, आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, महाराष्ट्र महानगर- पालिका अधिनियमातील कलम ५६.(१)अ अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार श्री. पॉल राजरत्नम करा, स्टाफ नर्स, नागरी आरोग्य सेवा सांगली यांना महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करीत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री. पॉल राजरत्नम करा, स्टाफ नर्स, नागरी आरोग्य सेवा सांगली, यांचे मुळ सेवा पुस्तकात घेण्याची आहे.

(नितीन कापडणीस)
आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका.

प्रति,
श्री. पॉल राजरत्नम करा, स्टाफ नर्स,
प्रत माहितीसाठी व जरुर त्या पुढील कार्यवाहीसाठी -
१. उपायुक्त (मुख्यालय)
२. वैद्यकीय आरोग्य अधिकारी,
३. मुख्य लेखाधिकारी,
४. मुख्य लेखापरिक्षक